कोर्ट प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** बुलढाणा **P.S.(ठाणे):** किनगाव राजा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0184 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 01/09/2023 21:16

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 29/07/2023
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 29/07/2023
   **Time From (वेळेपासून):** 13:35 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:17 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 01/09/2023 **Time (वेळ):** 21:01 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 014
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/09/2023 21:01 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पोलीस स्टेशन किनगांव राजा

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विश्वनाथ सोनाजी विर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1972

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हिवरखेड पुर्णा ,सिंदखेड राजा ,किनगाव राजा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हिवरखेड पुर्णा ,सिंदखेड राजा ,किनगाव राजा ,बुलढाणा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री अरुण गणपतराव मोहिते | | | 1. साइनाथ नगर मंठा चौफुली, जालना ,जालना ,कदीम - जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

विश्वनाथ सोनाजी विर, वय 51 वर्ष, व्यवसाय शेती रा हिवरखेड पुर्णा, ता सिंदखेडराजा, जि बुलढाणा, मो क 9923769029समक्ष टंकलिखीत फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे असुन वर नमुद ठिकाणी कुटूंबासह राहतो, व शेतीचा व्यवसाय करतो. मी दिनांक 29-07-2023 रोजी पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा. यांना फोनव्दारे माहीती दिली की, माझे तसेच माझे कुटूंबाविरुध्द पोलीस स्टेशन किनगावराजा येथे कलम 354 तसेच इतर कलमान्वये गुन्हा दाखल असून सदर गुन्हयात अटक करून हवालातमध्ये न टाकण्यासाठी आमचे गावचे बिट जमादार श्री मोहिते साहेब हे मला 20000/- रुपये लाचेची मागणी करित आहेत.
त्यावरुन पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम यांनी आगार व्यवस्थापक राज्य परीवहन महामंडळ बुलढाणा यांचे कार्यालयातून दोन शासकीय कर्मचारी यांना पंच म्हणून उपलब्ध करुन घेवून श्रीमती घोगरे मॅडम व दोन्ही पंच तसेच सापळा पथक हे त्याचे शासकिय वाहनाने ग्राम किनगावराजा ते दुसरबिड रस्त्यावर असलेल्या वर्दडी फाटयावर हजर आले. त्यावेळी घोगरे मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी सुध्दा वर्दडी फाटयावर ठरल्याप्रमाणे हजर आलो. श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझी वर नमुद प्रमाणे लोकसेवक श्री मोहिते, बिट जमादार यांचेविरुध्द लाच मागणी संबधाने तक्रार लिहून घेवून सोबत आणलेल्या शासकिय पंचाचा तसेच माझा आपसात परीचय करुन दिला व पडताळणी पूर्व पंचनाम्याप्रमाणे सुचना देवून व्हॉईस रेकॉर्डर बाबत सविस्तर माहिती दिली.
त्यानंतर मी दिलेल्या तकारीप्रमाणे श्री मोहिते, बिट जमादार हे माझेकडे लाच मागणी करतात काय? याबाबत त्यांची लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजित करणे असल्याने पोलीस उपअधिक्षक श्रीमती घोगरे मॅडम यांनी नापोकों लोखंडे यांचे करवी माझेकडे व्हॉईस रेकार्डर चालू करून देवून पंच क्र. 1 श्री .विठ्ठल भारती यांचेसह माझे खाजगी मोटार सायकलने 13.35 वा रवाना केले. त्यावेळी मी व पंच असे आम्ही पोलीस स्टेशन किनगावराजा येथे जावून श्री मोहिते, बिट जमादार यांची भेट घेतली असता झालेल्या भेटी दरम्यान मी त्यांचेशी आमचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात अटक करून हवालातमध्ये न टाकण्यासंबधी बोलणी केली असता झालेल्या बोलणी दरम्यान लोकसेवक मोहिते यांनी त्यांचे समोरील एका कागदावर 20000/- असे लिहून मला, वाचा म्हणलं हे असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की नाही वाचता येत नी, वाचता येत नी न मायच्यान त्यावेळी लोकसेवक मोहिते म्हणाले की, विस हजार रुपये, विस हजार, त्यावेळी मी मोहिते साहेब यांना म्हणालो की नाही लय व्हते न ते, त्यावेळी लोकसेवक मोहिते म्हणाले की, दहा, त्यावेळी मी मोहिते साहेब यांना म्हणालो की, दहा डायरेक सांगा न, त्यावेळी लोकसेवक म्हणाल की दहा हजार, त्यावेळी मी मोहिते साहेब यांना म्हणालो की, दहा हजार रुपये का? त्यावेळी लोकसेवक यांनी ह म्हणून होकार देवून मला तडजोडीअंती 10000/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम दिनांक 29-07-2023 रोजीच स्विकारण्यास संमती दिल्याने मी व पंच क्र.1 श्री. विठ्ठल भारती असे कारवाई पथकाजवळ परत आलो. त्यावेळी घोगरे मॅडम यांनी माझेत व लोकसेवक श्री मोहिते. बिट जमादार यांचेत लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान ध्वनीमुद्रीत झालेले संभाषन ऐकून लोकसेवक श्री. मोहिते यांची तडजोडीअंती 10000/- रुपये लाच मागणी असल्याबाबत खात्री केली. लोकसेवक श्री मोहिते हे लाच रक्कम दिनांक 29-07-2023 रोजीच स्विकारणार असल्याने सदर प्रकरणात सर्वानुमते दिनांक 29-07-2023 रोजीच सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे ठरविण्यात आले.
त्यानुसार पोलीस उपअधिक्षक श्रीमती घोगरे मॅडम यांनी माझेकडे लोकसेवक श्री. मोहिते यांनी लाच मागणी केल्याप्रमाणे त्यांना.देण्यासाठी 10000/- रुपये हजर करण्यास सांगीतले असता, मी माझेजवळ असलेले 10000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 20 भारतीय चलनातील नोटा अश्या घोगरे मॅडम यांचेकडे हजर केल्या असता, सदर नोटांचे क्रमांक हे सापळा पथकाचे मदतीने लिहून घेवून त्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्याची प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर लाचेची रक्कम ही माझे शर्टचे डाव्या बाजुचे खिश्यात ठेवून दिली. त्यानंतर पोलीस उपअधिक्षक, श्रीमती घोगरे मॅडम, दोन्ही पंच तसेच मी व सापळा पथक असे शासकिय वाहनाने किनगावराजा बस स्टॉपचे थोडे अलीकडे थांबून व्हॉईस रेकॉर्डर सुरु केल्यानंतर घोगरे मॅडम यांचे सुचनेनुसार मी

लोकसेवक मोहिते यांना फोन करून मी किनगावराजा येथील बस स्टॉपवर आलो असून बस स्टॉपवर असलेल्या असमत यांचे चहाचे हॉटेलवर येण्यास सांगीतले असता, लोकसेवक मोहिते हे मला म्हणाले की आला एका मिनीटात असे म्हटल्याने आपण सर्वानुमते ग्राम किनगावराजा बस स्टॉपवरील असमत यांचे हॉटेलमध्ये रितसर सापळा कार्यवाही आयोजित करण्यात आली असता बराच वेळ गेल्यानंतर लोकसेवक श्री मोहिते यांनी मला फोन करुन किनगावराजा बस स्टॉपचे थोडे समोर असलेल्या एका गॅरेजवर बोलाविल्याने मी व पंच क्र. 1 असे लोकसेवक मोहिते थांबलेल्या गॅरेजवर गेलो. त्यावेळी सापळा पथक सुध्दा आमचे मागोमाग गॅरेजच्या आजुबाजुला येवून थांबून राहीले. त्यावेळी मी, लोकसेवक मोहिते यांची भेट घेतली असता झालेल्या भेटीदरम्यान गुन्हयातील अटकेसंबधी बोलणी केली असता, झालेल्या बोलणी दरम्यान मी माझे शर्टचे डाव्या बाजुचे खिश्यातील लाचेची रक्कम काढून लोकसेवक मोहिते यांचे समोर दहा हजार आहे असे म्हटलो असता त्यावेळी लोकसेवक मोहिते यांना माझेवर संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम न स्विकारता तुम्हाला फोन करतो मी, जाऊ दया तुम्हाल फोन करतो मी असे म्हणून माझे जवळून निघून गेले त्यानंतर घोगरे मॅडम, दोन्ही पंच तसेच मी व सापळा पथक असे शासकीय वाहनाने किनगावराजा गावाचे बाहेर जावून थांबलो व घडलेली पुर्ण हकीकत पंच क्र 2 तसेच सापळा पथकास सांगीतली. त्यानुसार लोकसेवक श्री मोहिते बिट जमादार हयांनी मला फोन केल्यानंतर सदर प्रकरणात पुढील सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले होते. परंतु लोकसेवक श्री मोहिते यांना माझेवर संशय आलेला असल्याने त्यांनी मला आजपावेतो फोन केलेला नसून ते आता माझेकडून लाच रक्कम स्विकारणार नसल्याची माझी खात्री झाली आहे.

तरी लोकसेवक श्री अरूण गणपतराव मोहिते, वय 52 वर्ष, पद पोलीस हेडकॉन्स्टेबल, ब. नं 1291, नेमणुक पोलीस स्टेशन किनगावराजा, जि. बुलढाणा यांनी माझे व माझ्या कुटूंबाविरुध्द पोलीस स्टेशन किनगावराजा येथे कलम 354 तसेच इतर कलमान्वये दाखल असलेल्या गुन्हयात अटक करुन हवालातमध्ये न टाकण्यासाठी दिनाक 29-07-2023 रोजी 13.35 ते 14.17 वा. दरम्यान पोलीस स्टेशन किनगावराजा येथे मला पंचासमक्ष तडजोडीअंती गैरलाभ मिळवण्याच्या हेतूने 10000/- रुपये लाचेची मागणी केली आहे.म्हणून त्यांचेविरुध्द कायदेशिर फिर्याद आहे.मी माझा चुलत भाऊ श्री. रामेश्वर त्र्यंबक विर यांचेसमक्ष दिलेली तोंडी फिर्याद संगणकावर टंकलिखीत करण्यात आली त्याची प्रिंट काढून माझा भाऊ रामेश्वर विर यांचे समक्ष वाचून दाखविली ती मला समजली माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Dattatraya Mahadev Waghmare(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Dattatraya Mahadev
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीख/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (सेंमी(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**